ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : भगवंताचा सन्देश आणि त्याच्याकडे वाटचाल

लेखक : श्रीदत्ताबाळ

प्रकाशक : श्रीदत्ताबाळ मिशन डिव्हाइन, कोल्हापूर

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

श्रीदत्ताबाळ मिशन डिव्हाइन, कोल्हापूर.

199.9
Dat

# भगवंताचा सन्देश
# आणि
# त्याच्याकडे वाटचाल—

—श्रीदत्ताबाळ

199.9
Dat
493

742

199.9

मालक 493

ॐ

श्री साहेब, रणनवरेमामा व आकुनाई या ज्या त्रयींच्या अथांग प्रेमानें मला पुनीत केलें त्यांच्या चरणीं हा ग्रंथ मी अर्पण करीत आहे.

— श्रीदत्ताबाळ

श्रीदत्ताबाळ मिशन डिव्हाइन, कोल्हापूर.

# भगवंताचा सन्देश
# आणि
# त्याच्याकडे वाटचाल—

—श्रीदत्ताबाळ

ॐ

१ हें पुस्तक प्रत्येकानें शुद्ध व पवित्र जागीं ठेवावें.

२ या पुस्तकाबरोबर पूर्ण आशीर्वाद व दिव्य शक्तीचें भान सखोलतेंत जागृत केलें गेलें आहे; म्हणून पूर्ण एकाग्रतेनें, श्रद्धेनें याचें मनन करावें.

३ वाचकांना पुस्तकांत आढळणाऱ्या शंका जरूर दूर केल्या जातील.

— श्रीदत्ताबाळ

ॐ

प्रिय साधका,

तूं येथे दिव्य जीवनाचे धडे घेण्याकरिता येत आहेस. जीवन हें भगवत्-प्रकाशानें, आनंदानें व परमप्रेमानें उजळून जावें म्हणून तुझ्या साधनेचे प्रयत्न आहेत. " जिंदगानी की राह भी तारीक इस लिए अल्लाका चिराग़ दिया है ताज्जुब दे दिया सब कुछ लेकिन अपना न सुहाग दिया । " " मनुष्याच्या आयुष्याची वाट अंध:कारानें भरलेली होती म्हणून ईश्वरानें बुद्धीचा दिवा दिला. एवढेंच नव्हे, तर देवानें माणसाला सर्व कांही दिलें. पण त्यानें आपला पत्ता दिला नाही. " हा पत्ता तुला शोधून काढायचा आहे, आपल्या हृदयांत असलेल्या भगवंताला शोधायचें आहे.

आपण केवळ त्या भगवंताच्या हातचें साधन बनावें. त्याच्या अभिव्यक्तीला शरीर, मन, बुद्धि व अहमद्वारां वाव द्यावा व त्यायोगें आपल्या प्रकृतिस्थ जीवाचें सर्वान्तर्यामीं असलेल्या शिवांत, परमेश्वरांत परिवर्तन व्हावें असें जर तुला मन:पूर्वक वाटत असेल तरच तूं साधनेला योग्य आहेस असें समज. केवळ भगवंताकरिता भगवंत व दिव्यतेकरिता दिव्यता असते. ज्ञानाकरिताच ज्ञान हें ध्येय तुझें पाहिजे.

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

ॐ

पण या तळमळीमध्ये, मोठें होण्याची, योगी व्हावयाची, सिद्धि व सामर्थ्य मिळवावयाची तद्वतच जगत्कल्याणासारख्या सात्त्विक संकल्पाची सुद्धा भेसळ असतां कामा नये. फक्त त्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा व त्याच्या वैश्विक इच्छासूत्राप्रमाणे वागायचें हाच साधनेंतला तुझा संकल्प हवा. विशेषत: पूर्ण शरणांगति व त्यासाठी साधनेआड येणाऱ्या सर्व गोष्टींची भगवत्प्रेमाच्या भडकत्या अग्नीमध्ये आहुति द्यावयाला हवी. पण दिव्य व भगवत्‌जीवनाची साधना स्वीकारण्यापूर्वी तूं दृढ असा निर्णय घेतला पाहिजेस. अर्थातच हा निर्णय घेतल्यानंतरसुद्धा तो कायम व स्थिर ठेवणें अत्यावश्यक आहे. मी माझ्या व्यक्तिगत अहं-भावाचा पूर्ण निरास करून जेथे तेथे भगवद्‌भावाला स्थापन करणार, माझ्या श्वासोच्छवासांत व शरिराच्या अणु-रेणूंत मी भगवत्‌जाणीव अनुभविणार, " ईशावास्यं इदं सर्वम् । " यासाठी मला क्षणभंगुर सुख, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, कीर्ति यांचा त्याग करावा लागला तरीहि हरकत नाही. अशाप्रकारचा निर्णय घे. लक्षांत ठेव की हा निर्णय केवळ मानसभूमि

ॐ

(Mental Plane) यावरच दृढ असता कामा नये, तर शरीर, बुद्धि व प्राण या सर्व जाणिवेच्या पातळीवर ज्वलंत राहिला पाहिजे.

शरीर, बुद्धि, प्राण यांच्याकडून या निर्णयाला योग्य असेंच वर्तन झालें पाहिजे. असें झालें की या निर्णयाला अभीप्सेचें स्वरूप येतें. अभीप्सा म्हणजे मन, बुद्धि, प्राण व शरीर यांना व्यापित असलेली व भगवत्–प्राप्तीकरिता तळमळणारी आन्तरिक तीव्र आकांक्षा ! हिचें स्वरूप एखाद्या शांत स्थळीं असलेल्या नंदादीपाप्रमाणे हवें. या अभीप्सेमध्ये उत्कटता हवी, पण चंचलता व अस्थिरता नसावी; केवळ शांत प्रतीक्षाहि असूं नये, तर उत्कट, उत्सुक व तळमळपूर्ण असें भगवंतासाठी आवाहन असावें. तुला राधेची तळमळ माहिती आहे ना ? भगवान् रामकृष्ण परमहंस देवांची जगदंबादर्शन–प्रीत्यर्थ असलेली अभीप्सा माहित आहे ना ? रात्रंदिवस ते तिच्या दर्शनासाठी हृदय पिळवटून रडत असत. अशा वेळींच त्यांना तिचें दर्शन झालें. पुढे पुढे ते म्हणत फक्त तीनच दिवस व्याकुळ होऊन त्याच्या–

ॐ

साठी रडा. तो तुम्हांला दर्शन देईल. अभीप्सेचें स्वरूप इतकें तीव्र हवें. तुझी साकार वा निराकार अशा कोणत्याहि स्वरूपावर श्रद्धा असो.

भगवंताप्रीत्यर्थ तीव्र अभीप्सा म्हणजेच अंतरात्म्यानें त्याच्या चरणीं वाहिलेला प्रार्थनांचा होम. ही तळमळ निर्लिप्त हवी; तसेंच तूं संपूर्णतः मोकळा झाला पाहिजेस. इतर ध्येयें व तुझ्या भगवंताविषयीच्या मानसिक, बौद्धिक, प्राणिक कल्पनांना तूं मुळीसुद्धा थारा देतां कामा नयेस. कारण मन, प्राण, बुद्धि व शरीर हीं सारीं कर्मेन्द्रियें कनिष्ठ चेतनेच्या व प्रकृतीच्या मायेच्या हातचीं साधनें आहेत; व ती चेतना तर अज्ञानमय, अंधःकारमय व जड आहे. तद्वतच तिचीं साधनेंसुद्धा तशीच आहेत. म्हणून या साधनांच्या साध्याविषयीच्या कल्पनाहि तशाच असतात. भगवान् दिव्य, विश्वव्यापी वा साकार वा निराकार आहे. अशा कोणत्याहि कल्पना कुठल्याहि चेतनेच्या स्तरावर बांधूं नको. बालकवत् श्रद्धा व अभीप्सा ठेवून म्हण, "प्रभो, माझ्या मूळ चेतनेला तुझें स्वरूप दाखव; तुझ्या ज्ञानदीप्तीनें मला

ॐ

मार्गदर्शन कर." असें म्हटलेंस की भगवंत तुला लोहचुंबकाप्रमाणे ओढून घेतील. एखाद्या लहान मुलाला त्याची माता सहज न धक्का लावतां उचलते, तद्वतच भगवंत तुला आपल्या जाणिवेंत व प्रकाशमय ज्ञानपूर्ण चेतनेंत अलगत उचलतील. सत्य चेतनेची सुवर्णासम भासणाऱ्या पात्रांनीं बंद असलेलीं द्वारें उघडतील. "हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापहितं मुखम् !" लक्षांत ठेव, परमेश्वर जसा तुझ्या हृदयाच्या गूढ भागांतल्या नीरव गुहेंत आहे, तसाच तो अत्यंत बाह्यचेतनेवरच्या क्षणभंगुर बुडबुड्यामध्येहि आहे. जसा तो सत्यलोकांच्या स्तरावर सच्चिदानन्दमय लीला आपल्या सर्व पूर्णतेनें खेळतो आहे, त्याचप्रमाणे अंधारमय अशा जड जाणिवेच्या "पाताळ" विश्वांतहि अज्ञान–बुरखा घेऊन क्रीडा करीत आहे. जसा तो निराकार, ब्रम्हस्वरूप झाला आहे, तसा तो त्रैगुण्यशील प्रकृति व माया म्हणून नर्तन करीत आहे. तेव्हा लक्षांत ठेव तुझी साधना ही सर्वव्यापी ईश्वराची आहे. म्हणून तिचें स्वरूप केवळ व्यक्तिगत व मर्यादित नाही; वैश्विक व अमर्याद आहे. तुला भगवान् सूर्य सतत हृदय–नेत्रापुढे



कै. म. म. द. वा. पोतदार;
ग्रंथ संग्रह

ॐ

ठेवून या अभीप्सारूपी गरुडांनीं अध्यात्माच्या अनन्त अवकाशांत झेंप घ्यावयाची आहे. गरुडाचें उदाहरण डोळ्यासमोर ठेव. आपल्या पृथ्वीवरच्या घरट्याकडे नजर न ठेवतां अवकाशांत त्याच्या भराऱ्या सतत चाललेल्या असतात.

विश्वनिर्मिति व विश्व–अन्त व साऱ्या जगताच्या क्रियाशील व अक्रियाशील अशा साऱ्या घटना व कर्मामधून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या सरळ जाणिवेच्या स्तरांवर भगवत्-संकल्पच कार्य करीत असतो; अत्यन्त गहन व सखोल, सूक्ष्म अशा अन्तरात्म्याच्या अस्तित्वांतच या संकल्पाचें स्पंदन अनुभवास येतें. तुला त्याच्या संकल्पाशीं आपल्या संकल्पांचें मीलन करावयाचें आहे. तेव्हा तूं पूर्णपणें त्याच्या संकल्पांशीं अद्वैत अनुभवशील, तेव्हा कोणतींहि कर्मं तुला बाधणार नाहीत. तूं भूतलावर वा इतर सर्व जगतांत मुक्त जीवात्मा म्हणून नांदशील. साऱ्या विश्वाची कोडी तुझ्या अन्तश्चक्षूसमोर विदित होतील. शब्दरूप विचारांचें स्थान अशब्दतेंतून व्यक्त व प्रगट होणारी अन्तःस्फूर्ति घेईल. पण चेतनेच्या नसांनसांतून अभीप्सेची बिजली खेळल्यावाचून हें

ॐ

नाही साध्य व्हायचें. ज्या प्रमाणांत तुझी तळमळ व अभीप्सा अधिक, त्याच प्रमाणांत तुला आन्तरिक व बहिर्मार्गदर्शन मिळत जाईल. त्या वेळीं एखादें हिरवेगार झाडाचें पानसुद्धा तुला आनन्दलहरीवर नेऊन सोडील. नीरव व असीम अवकाश तुला भगवंताच्या अनन्त व निराकार रूपाची भावना उद्दीपित करून देईल. प्रत्येक नवीन उगवणाऱ्या पहाटेबरोबर तुझ्या जाणिवेचीं नवीन अंगें उमलतील. साऱ्या जड व सूक्ष्म जगतांतील प्रेरणा, क्रिया, शक्ति, ज्ञान या सर्वांचें उगमस्थान, मूलस्थान असीम परमात्मस्वरूपच आहे. याच स्वरूपाशीं, उगमस्थानाशीं ज्या वेळीं तूं ऐक्य अनुभवशील त्या वेळीं त्याच प्रेरणा, तेंच ज्ञान, तीच शक्ति सर्व कांही तुझ्या हृदयचक्रांतून उफाळून येईल. जें शास्त्रीय ज्ञान मानवी बुद्धीच्या आवाक्याबाहेर आहे तें तुला अन्तःस्फूर्ति शिकवेल, तुझ्या चेतनेचीं नवीन अंगें उमलतील; तुझी संकल्प-शक्ति ही एक विश्वप्रकृतीच्या संकल्प-सिद्धीचा स्फुल्लिंग आहे. पण याची तुला अज्ञामामुळे जाणीव नाही. सुप्त रूपांत या तुझ्या संकल्पांत साऱ्या विश्वप्रकृतीचें सामर्थ्य



के. म. म. द. वा. पोतदार
... ंगाद

ॐ

सांठविलें गेलें आहे विश्वामित्रांची प्राणिसृष्टि, मॅडम क्यूरीचा रेडियमचा शोध, कोबाल्ट बॉम्ब, अतर्क्य सिद्धि-सामर्थ्य हीं सारीं या शक्तीचींच प्रतीकें नव्हेत का ? जीवनाच्या याच संकल्प-भूमींतून अभीप्सेच्या यज्ञकुंडांत अग्नि धडाडून पेटवलास की भगवत्प्रकाश, शान्ति, सुसंवाद या देवतांचें अवतरण झालेंच म्हणून समज. अभीप्सा तीव्र कर. भगवंतासाठी, केवळ त्याच्या-चसाठी तुझें हृदय पिळवटून जाऊं दे. अहं व इतर प्रकृतीच्या अंगांचा पूर्ण त्याग कर किंवा त्यांना अभीप्सेच्या ज्वाळेंत वित-ळवून विश्वाहंकार व विश्वप्रकृतीचें स्वरूप दे.

त्याची उपासना ही आत्म–उपासनाच आहे. केवळ आपण सत्यपूर्ण व आत्मस्थित होण्यानें भगवंताची खरी उपासना करूं शकूं. भगवान् येशू ख्रिस्ताचे शब्द हृदयावर कोरून ठेव.

God is a spirit, and they that worship Him must worship Him in spirit and truth.

ॐ

भगवंताला सर्वांगीण, संपूर्ण समर्पण करणें ही एक मोठी कठीण प्रक्रिया आहे. पण तूं जर स्वत:च्या हृदयांत प्रवेश करून जेथून अहंभावाचें पहिलें स्पन्दन सुरू होतें तेथे विलीन पावलास तर तुला असें आढळून येईल की या अहं-स्पंदनामध्येच मन, प्राण, स्थूल शरीर, मेंदूच्या सर्व क्रिया व अन्तर्मनाच्या सर्व क्रिया या ज्या एका शरीरस्थ जीवाच्या स्पन्दनानें होतात त्या जीवाच्या सखोलतेंत ईश्वराकडे जाण्याची ऊर्ध्वगामी प्रेरणा अगोदरच, सृष्टि-निर्मितीच्या वेळींच भगवंतांनीं घातलेली आहे असें मला आढळून येतें. तीव्र तळमळीनें ही ऊर्ध्वगामित्वाची महान् प्रेरणा मनस्तरावर आपण आणूं शकूं. जीव-स्पन्दनेच्या अन्तर्यामांत असलेल्या या ऊर्ध्वगामी प्रेरणेचें स्वरूप प्रकृतीच्या आधीन असलेल्या मनास येणें शक्य नाही. पण ज्या वेळीं पूर्ण शान्ततेमध्ये मन विलीन होतें व अन्तर्यामांत विलसूं लागतें त्या वेळीं त्या प्रेरणेचें स्वरूप लक्षांत येतें व आपणांला पटतें की भगवंत आपणाला स्वत:मध्ये उचलून घेण्यास उत्सुक आहे. ते महान् परमात्म्याचें स्वरूप जीवात्म्याला आपल्यांत मिसळून घेण्याला आतुर आहे.

ॐ

प्रिय साधका, केवळ मनाचा लय जीवात्म्यांत होऊन भागणार नाही. तर जीवात्म्यानें आपलें शरीरस्थ स्थान सोडून ऊर्ध्वगामी प्रेरणेच्या प्रवाहांत स्वतःला समर्पणपूर्वक आधीन करून ब्रम्हरंध्राच्यावर असणाऱ्या विश्वव्यापक ईशशक्तीच्या सागरांत स्वतःचा प्रवेश करून दिला पाहिजे. मीं असें पाहिलें आहे की ब्रम्हरंध्राच्यावरती एक श्वेतपट्टी अवकाशाकडे चाललेली दिसते. त्याचप्रमाणे तशीच एक श्वेतपट्टी मनुष्याच्या मूलाधारांतून पृथ्वीच्या केंद्राकडे जाते. या श्वेतपट्टीचें उगमस्थान मनुष्याचें हृदयचक्र आहे. या ब्रम्हरंध्राच्यावर असलेल्या श्वेतपट्टीचें अंतिम स्थान सूर्यकेंद्र आहे. अर्थात् हा जो सूर्य तो अंतर्जगांतील सूर्य आहे. जसें मानवी देहाला सूक्ष्म देह आहेत, त्याप्रमाणे सूर्यमालिकेचा उगम जो स्थूल सूर्य त्याला तशींच सूक्ष्म शरिरें आहेत व त्या सूक्ष्म सूर्यामध्ये ही आपली ब्रम्हरंध्रांतून निघणारी श्वेतपट्टी विलीन होत असते. पूर्ण जीवनमुक्त याच सूर्यकेंद्रामध्ये स्थिर झालेला असतो. ज्या वेळीं मानव या सूक्ष्म सूर्यकेंद्राशीं विलीन पावेल, त्या वेळींच तो शरीरराहित्याचा व विश्वात्मक-

ॐ

तेचा प्रथमानुभव घेऊं शकेल. गूढ दृष्टया बोलायचें झाल्यास तुला या श्वेतपट्टिकेद्वारां तुझ्या जीवात्म्याला शरीर, बुद्धि, मन, प्राण यांचा लय करून या दिव्य सूर्यकेंद्राकडे प्रवास कारवा लागेल.

हें अंतर्जगांतील सूर्यकेंद्र विश्वप्राण, वैश्विक जडतत्त्व व जीव-प्रेरणा यांचें उगम स्थान आहे. ज्या वेळीं परम ईश्वरी सत्तेला विश्वामध्ये स्थूल व सूक्ष्म फेरफार करावयाचे असतील, त्या वेळीं या सूक्ष्म सूर्यकेंद्रांत ते प्रथम प्रेरिले जातात. Theosophy नें मनुष्याच्या सूक्ष्म देहाचें सुंदर विश्लेषण केलेलें आहे, पण या ऊर्ध्वगामी श्वेतपट्टीचें कांहीच कसें सांगितलें नाही याचें मला आश्चर्य वाटतें.

हें सूक्ष्म सूर्यकेंद्र हें प्राणिमात्रांच्या तसेंच झाडें, वनस्पति, अस्तित्वाच्यावर केंद्रित झालेलें आहे. ही श्वेतशलाका मीं वनस्पतींच्यावरहि पाहिलेली आहे. ज्या वेळीं साधक आपल्या जीवास या श्वेतपट्टीच्या द्वारां ऊर्ध्वगामी करतो, त्या वेळीं या मष्नुयाच्या वीर्य-शक्तीचें रूपांतर ओजस् शक्तीमध्ये होतें; व



कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

ॐ

ज्या वेळीं मनुष्य या सूक्ष्म सूर्यकेंद्रांत विलीन होतो, त्या वेळीं या ओजस्‌चें रूपांतर तेजस्‌मध्ये होतें आणि ती तेजस्‌ या रूपांत राहणारी व सूर्यदिव्यकेंद्रांनीं संपृक्त अशी एक प्राणशक्ति निर्माण होते व तिचा सरळ संबंध या दिव्य सूर्यकेंद्राशीं असल्यामुळे साधकाच्या शरिरामध्ये विश्वप्राणांचा संचार होऊं लागतो आणि उत्तरोत्तर शरीर भगवंताच्या प्रकटीकरणासाठी योग्य होत जातें. लक्षांत ठेंव की हें सूक्ष्म दिव्यकेंद्र हें असीमतेकडे नेणारें पहिलें सुवर्णमय द्वारच होय. या सूर्यकेंद्राच्या पलीकडे असीमता व अथांगता स्पंदत असते व या ठिकाणीं साधकाला महान असीमतेची व महानिर्वाणाची अनुभूति येते आणि येंथेच सर्व स्थूल व जड जगतांच्या मागें नांदणारी महान नीरवता अनुभूतीस येंते.

प्रिय साधका, मनावर पूर्णपणें हा मुद्दा बिंबव की केवळ अन्तर्मुख होण्यानें भागणार नाही, तर त्यानंतर ऊर्ध्वगामी झालें पाहिजे. ज्या वेळीं तूं सूर्यकेंद्रापलीकडील असीमतेंत नांदूं लागशील त्या वेळीं तुला असें अनुभवाला येंईल की देहामध्यें

ॐ

दहराकाशामध्ये केवळ ईश्वराचा एक स्फुल्लिग प्रकट झालेला आहे की जो मन, बुद्धि, प्राण या द्वारें स्पंदत असून मनुष्याला अस्तित्व देत आहे. पण विशाल समष्टि ईश्वरीय स्वरूप हें संबंध शरिरांत सामावून विश्वामध्यें व्यापून राहिलें आहे व आपलें शरीर बिन्दुमात्र आहे. साधका, कोणत्या धर्माचा, पंथाचा तत्वज्ञानाचा विरोध असो किंवा पाठिंबा असो मला त्याचें कांही नाही. सत्य-प्रकटीकरण हेंच माझें मी कर्तव्य समजतों. आता आपण थोडेसें या सूर्यकेंद्राविषयी विचार करूं.

अन्तर्जगतांतील हें सूर्यकेंद्र ( Psychic centre of the Sun ), संपूर्ण अंतर्विश्वांना सूक्ष्म शक्ति, त्यांच्या वर्धापनास योग्य अशा प्रेरणा प्रेरीत असतें. ज्याप्रमाणें स्थूल विश्व हें स्थूल सूर्याकडून जगविलें जातें, त्याचप्रमाणें त्याच्या सूक्ष्म देहाकडून अन्तर्विश्व जगविलें जातें. सर्व प्राणि-जगत् या दिव्य, सूक्ष्म सूर्यकेंद्र व सूक्ष्म पृथ्वीकेंद्र यांच्यामध्ये वावरत आहे. हृदयस्थ जी जीवशक्ति स्पंदत आहे, तेथून अवकाशांत उंच व पृथ्वींत सखोल अशा दोन श्वेतशलाका सूर्यकेंद्र व पृथ्वीकेंद्र यांना जोडतात. हें सूर्यकेंद्र

ॐ

मानवाच्या आत्मजाणिवेशीं विशेष व प्रकर्षानें निगडित असतें. त्याचप्रमाणे जडतत्त्वाशीं पृथ्वीकेंद्र निगडित असतें. भगवंतांनीं ज्या वेळीं जीवप्रेरणा निर्मिली, त्या वेळीं त्याच्यांतील आत्म-अस्मिता ही सूर्यकेंद्रापासून प्रेरिली. मीं माझ्या एका कवितेंत या सूर्यकेंद्राविषयी लिहिलें आहे—

## The SPiritual Sun

High up in the land of beyondness,
On the high-way of mind's gay,
And above the region of thought and taught,
The spiritual sun dwells
    with its immensely vibrant throb of silence,
In which the cosmic unity
    with permanent glow of spirit's light,
The being enjoys with total fulness.
The seer sees the volcanoes of vaster visions,
With intuition's fast rapidity,
Bursting out from this unity's centre,
To sanctify the clouded sight of the mortal,

ॐ

With the clairvoyant clarity
      of Godly flight towards the unknown.
My silent heart sees through the wide gate
                              of the opened soul.
The spiritual Sun, above the head of the mind
      and beneath the endless bottom
Dwelling in its occult mystery,
      moves the heavenly worlds around its centre.
The Sun which lives in every throb of life
And penetrates through every lively creation's movements
Thrills the heart of the seer
      and makes him jump into the deep valley of soul.
The spiritual Sun,
      whose rare sight scarcely seen by the baked being,
Rejuvenates the reckless heart
With the righteous roar
      of soul's thrilling upward travel.
Sorrow and pain will be no more,
When the mortal's fleshy eyes of insight
      will see the spiritual sun
With the divine eye inside.

ॐ

उत्तुंग उंच अशा पलीकडल्या साम्राज्यांत
मनाच्या उच्च आनंदमय पथावर,
आणि विचार व शिकवण यांच्या पलीकडे,
दिव्य सूर्य आपल्या तीव्र, नीरव स्पंदनांनीं युक्त
असा विलसत असतो.
त्यामध्ये विश्वात्मभाव आत्म्याच्या प्रकाशामध्ये
सम्पूर्ण पूर्णतेनें जीव अनुभवतो.
विशाल, दिव्य दर्शनांचे ज्वालामुखी, अंत:स्फूर्तीच्या
तीव्र संवेगानिशीं, या एकात्मकतेच्या केंद्रापासून
उसळतांना द्रष्टयास ( seer ) मानवी, मर्त्य व
( अज्ञानांधकारानीं ) ढगाळलेल्या दृष्टीस अज्ञाताकडे
झेंपावणाऱ्या दिव्य दृष्टीच्या सूक्ष्मतेसह, पवित्र व पावन
करण्यासाठी दिसतात.
माझें प्रशान्त हृदय, आत्म्याच्या उघडलेल्या
द्वारामधून मनाच्या शीर्षभागीं
आणि असीमतेच्या सखोल तळभागीं ( bottom )

ॐ

दिव्य सूर्य आपल्या गूढ स्थानीं विलसत असतांना
पाहतें व अनेक दिव्य जगतांना तें आपल्या
केंद्राभोंवती फिरवितें.

जीवनाच्या प्रत्येक स्पंदनांतून व चराचराच्या
प्रत्येक हालचालींतून हा सूर्य राहतो व त्यास
पाहणाऱ्याचें हृदय भरकावतो आणि त्याला
आत्म्याच्या खोल दरींत उडी घेण्यास लावतो.

ह्या सूर्याचें क्वचित् दर्शन संसारतापांनीं पोळलेल्या जीवास चुकून कधीतरी होतें व तें दर्शन भग्न हृदयांना आत्म्याच्या पुनर्जीवित पवित्र गर्जनेनीं जीवाच्या ऊर्ध्वगामी प्रवासासह करवतें.

ज्या वेळीं मर्त्याची स्थूल ' अन्तर्दृष्टि ' हा दिव्य सूर्य ईश्वरीय नेत्रांनीं पाहील, त्या वेळीं दुःख व वेदना राहणार नाहीत.

जो आत्म्याचें ऐक्य परमात्म्याशीं अनुभवतो व त्या महान् मीलनाचें प्रकटीकरण दुसऱ्या जीवांमध्ये पूर्ण एकतानतेमध्ये, अधिक्षेपित करतो तो सद्‌गुरु होय. सद्‌गुरु अथांग प्रेमाचा सागर, नीरवतेचा धनी व कृपेचा निर्झर असतो.

ॐ

त्याच्या दृष्टींतून, स्पर्शांतून अनंतता, ईश्वरत्व प्रगटत असतें. शब्द, स्मरण, स्पर्श यांवाटें तो शिष्याच्या हृदयांत ती ओततो व त्याला आत्मजागृत करतो. शिष्यांत व सद्गुरूंत एक अतूट आन्तरिक नातें असतें. सद्गुरूंची परमात्मस्पंदना, शिष्याच्या जीव-प्रेरणेशीं गूढ रीत्या जोडलेली असते. शिष्य सद्गुरूंत सामावलेला असतो. शिष्याच्या जीवाभावाची सूक्ष्म स्पंदनें सद्गुरूच्या आंत सदोदित उमटत असतात. ज्या ज्या वेळीं सद्गुरु त्याला आन्तरिक मदत करतात, त्या त्या वेळीं ते शिष्याच्या स्पंदनेवर एकाग्रित होऊन शिष्यांत उच्चतर भाव, शक्ति, ऊर्ध्वगामित्वाची प्रेरणा सबळ करतात व त्यास वर खेंचण्याचा प्रयत्न करतात.

माझ्या लाडक्या साधका, कधीहि सद्गुरूंना खालीं पाहूं नकोस; त्यांच्यांत परमात्मा पाहण्यास शीक. त्यांची साधीसुधी आज्ञाहि उल्लंघूं नकोस. जितकें तीव्र व निस्सीम प्रेम तुला त्यांच्यावर करतां येईल तितकें कर. कारण तुझं प्रेम हेंच एक मानवी स्तरावरील आत्मसंवेदन आहे. हें प्रेमच तुझ्यांतला व

ॐ

सद्‌गुरूंतला आन्तरिक धागा बळकट करणार आहे. सद्‌गुरु म्हणजे तुझेंच खरें स्वरूप जें परदेहांत प्रगट झालेलें असतें. सद्‌गुरूचीं कर्में कधीहि मनाच्या तुझ्या कल्पनांनीं निश्‍चित करूं नकोस. त्यांचीं कर्में मनातीत भूमिकेवर असतात. तीं समजण्यासाठी नीरव चित्त हाच उपाय आहे. खऱ्या गुरूचें पृथ्वीवर केवळ अस्तित्व ही एक महान् शिकवण असते. त्यांच्या हृदय-गाभ्यांतून निघणारें दिव्य संवेग व स्फूर्ति साऱ्या अन्तर्विश्वाला व्यापतात व जेथे जेथे योग्य मनोभूमि व योग्य आधार असेल, तेथे तेथे त्या प्रगट होतात व दूरवरच्या अनोळखी-पण सच्चा-साधकाला त्या मदत करतात. सद्‌गुरूंचा सूक्ष्म देह कोठेंहि संचार करूं शकतो व मदत करूं शकतो.

श्री अरविन्द-आश्रमाच्या श्री माताजींच्यामधून अनेक दिव्य शक्ति जगाला न कळत मदत करतांना मीं पाहिलें आहे. त्यांच्या शरिरांतून विद्युत्‌शलाकेसारख्या या शक्ति सर्वत्र पसरतात व त्यांच्याबद्दल माहिती नसणाऱ्यालाहि त्या मदत करतात.



कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

ॐ

जोंपर्यन्त तुझ्यांत काम-प्रेरणेसारख्या नीचतम प्रेरणा आहेत, तोंपर्यन्त आत्म्याला गुरु करायचें व अन्तर्मार्गदर्शनच घ्यायचें असे संकल्प करूं नको. स्वतःला योग्य असें तत्त्वज्ञान बनवूं नको. रे, तुझाच आत्मा फक्त दुसऱ्या शरिरांतून शिकवण तुला देत असेल व जागृति आणत असेल तर ती स्वीकार. गुरुहीन मार्गांत धोके आहेत, भ्रम आहे. जीझस्, रामकृष्ण परमहंस, श्रीमाताजी या सर्वांना गुरु होतेच.

सद्गुरूंना हृदयांत बाळग; मनोमन त्यांची पूजा कर; कृतज्ञता व्यक्त कर व भरल्या हृदयानें आंसवें आणून म्हण, " प्रभो, मला उचला; दिव्यतेंत स्थिर करा. तुमच्या इच्छासूत्राप्रमाणे माझी घडण बनवा. ज्या योगें मी तुमचें स्वरूप आकळूं शकेन, असें करा. "

आत्म्याचें स्वयंभू व स्फूर्त मार्गदर्शन स्वीकारणें प्रथमावस्थेंतल्या साधकाला कां कठीण असतें हें पहा. मानवी जाणीव सध्या जडतत्त्वाशीं संबद्ध आहे. जडतत्त्वांत असलेल्या अधोगामित्वाच्या प्रेरणेच्या प्रवाहांत मानवी जाणीव व मन वाहत आहे.



म/९८६
शि. प्र. मंडळी म. म. ग्रंथालय
493

ॐ

त्यामुळे मनाचा प्रवाहहि सूक्ष्म पृथ्वीकेंद्राकडे आहे. त्यामुळे तूं सद्यःस्थितींत नीरवतेंत जावयाचें ठरविलेस तर कदाचित् सूक्ष्म पृथ्वीकेंद्रांत (Psychic centre of the earth) "नेणीव" या जाणीवरहित शून्यांत जाशील व दिव्यतेचे उलट टोंक अनुभवशील.

नीरवतेंत जाण्यासाठी अधोगामी प्रेरणेचें रूपान्तर, समर्पण, ध्यान, प्रार्थना वा इतर तपादि मार्गांनीं ऊर्ध्वमुख केलें पाहिजे व तें सद्गुरूच्या छत्राखालीं शिकलें पाहिजे. त्यानंतरच तूं "परमात्मा" अनुभवशील. पृथ्वीकेंद्र व दिव्य सूर्यकेंद्रापलीकडे विश्वव्यापी नीरवता अनुभूतीस येते. दोन्हींहि केंद्रांपलीकडे अथांगता आहे, पण सूर्यकेंद्रापलीकडल्या अथांगतेंत मानवाची अस्मिता विश्वव्यापी होऊन जीवात्म्याला महाजागृति येते. स्वतःच्या खऱ्या स्वरूपाविषयी तो पूर्णपणें जागृत होतो व नेणीवेंत वा पृथ्वीकेंद्रापलीकडे तो विस्मृत व जड होतो. जड शून्यता अनुभवतो त्यामुळे महाजागृत अशा सद्गुरूकडून आन्तरिक सूक्ष्म धागा जोडून त्याच्या अनंत प्रकाशांत जाणीव विहार करण्यासाठी सोडावयास शीक.

ॐ

७८ वर्षांच्या एका माझ्या नॉर्वेजियन स्त्री अनुयायांनीं (एड्ल अल्मा सावस्लुंड) केलेली प्रार्थना मला फार आवडली. ती—

Oh, let me be drowned
In my deep love for my Guru,
That I may perform my *sadhanas*
With pleasure and precision,
That I may never cause him
Any displeasure or disappointment,
But expand my love so as
To comprise the whole world
In sweet unison with him
For ever and ever.

खरा सद्गुरु मिळणें कठीण आहे, व मिळालाच तर त्याला आपलें पूर्ण सर्वस्व अर्पण करणें कठीण आहे. त्या सर्वस्वांत सर्व कांही येतें. सद्गुरु खरा मिळावा म्हणून भगवंताकडे मागणी कर. सद्गुरु मिळाल्यानंतर सत्याचें पालन तीव्रतेनें कर. व्यवहारांत ही गोष्ट कठीण आहे खरी, पण भगवत्प्राप्तीसाठी

ती अत्यावश्यक आहे. केवळ सत्य पालनानेंहि ईश्वर मिळूं शकेल. सत्य सुन्दर असतें, भगवंताकडे नेतें. वाचिक सत्यांतूनच आन्तरिक सत्याकडे जातां येतें. सत्यपालनानें तुझ्या वाचेंत सामर्थ्य येईल व कालान्तरानें अंगीं एक स्थिति येते की वाग्-इन्द्रियाचा ताबा आन्तरिक शक्ति घेते व अन्तिम कल्याणाच्या व भगवंताच्या दृष्टीनें योग्य तेंच तुझ्या मुखांतून बाहेर येईल. मग तें स्थूल जगताच्या दृष्टीनें कठोरहि असो; पण ही पुढची स्थिति आहे. सध्या वाचिक सत्यापासून सुरवात कर. माझ्या अनुभवानें सांगतो की सत्यांत व त्याच्या पालनानें प्रचण्ड शक्ति अन्तर्यामांत प्रगट होऊन वेळोवेळीं मदत व मार्गदर्शन करते. केवळ भगवंता-करिताच जीवन जगायचें असेल तर सत्याच्याच प्रकाशांत श्वासोच्छ्वास घें.

प्रथमावस्थेंत तूं तुझ्या आदर्शाप्रमाणे सत्यपालन करण्यास शीक. तें तुला पूर्णतेनें करतां येऊं लागलें की भगवंताच्या दृष्टीनें जें सत्य आहे तें तुला आंतून कळूं लागेल व कांही काळानें सत्य तेंच तुझ्या तोंडांतून बाहेर पडेल. सत्याशिवाय केलेलें जप,



.. म. म. व वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

ॐ

तप, ध्यान, प्राणायाम अगदीच व्यर्थ होय. नीति व धार्मिक आचार, विचार हे केवळ मनस्तरावरील चित्तशुद्धीचे मार्ग आहेत. पण सत्य हें आत्म्याकडे जाण्याचें राजद्वार आहे. एक सुन्दर परदेशीय वचन आहे, " जर तुमच्याजवळ सत्य असेल, तर पृथ्वी–प्रदक्षिणा कराल; पण जर असत्य असेल, तर चार पावलें जातांच अडखळून पडाल. "

मानवी जीवनाचा विचार करतां मला परिकथेंतल्या कांही प्राण्यांची आठवण येते. अर्ध मानवशरीर व अर्ध पशुशरीर अशी सध्याची मानव जातीची स्थिति आहे. कनिष्ठ प्रकृति व दिव्य सत्ता यांच्यात मानव अडकला आहे. मानवांतलें पशुत्व म्हणजे क्रूरता, काम, हिंसा, युद्धपिपासुवृत्ति, स्वार्थ, स्वतःचें अस्तित्व टिकविण्याकरिता केलेलें क्रौर्य इत्यादि होत.

याचें एकच कारण म्हणजे कनिष्ठ विश्वप्रकृति जिची पकड सर्व विश्वावर सध्या तरी आहे. गूढ दृष्टीनें सांगायचें झाल्यास जड तत्वांत अधोगामित्वाची प्रेरणा प्रकृतीनेंच घातली आहे.

ॐ

ज्याप्रमाणे आत्म्यांत ऊर्ध्वगामित्वाची प्रेरणा आहे, त्याप्रमाणे जड तत्त्वांत अधोगामित्वाची प्रेरणा आहेच. ह्या प्रेरणेंचें मूळ ज्या वेळीं मी शोधूं लागलों, त्या वेळीं तें पृथ्वीचें सूक्ष्म केंद्र आहे हें मला दिसून आलें. सूक्ष्मजगतांत जड तत्त्वाला सर्व वर्धापनाच्या प्रेरणा हें सूक्ष्मकेंद्र ( Subtle Centre ) पुरवत असतें.

अधोगामित्वाची ही जी प्रेरणा आहे ती सर्व चेतन व अचेतन जड तत्त्वांत बद्धमूल झालेली आहे. ह्या अधोगामी प्रेरणेंचें ( सूर्य मालिकेपुरतें सांगायचें झाल्यास ) उगमस्थान सूक्ष्म पृथ्वीकेंद्र आहे. ज्याला ईश्वर हवा आहे, त्यानें जड शरिरांत असलेलें या अधोगामी प्रेरणेला ऊर्ध्वमुख केलें पाहिजे. असत्, अब्रह्मचर्य, इत्यादि सर्व गोष्टी या अधोगामी प्रेरणेचीं सहज प्रगटीकरणें आहेत. कामसंयम व सत्य या दोन महान् साधनांनीं ती सर्व शक्ति वर नेतां येते व ईश-प्राप्ति करून घेतां येते. माझें तुला शेवटचें सांगणें : ईश्वर आहे, तो सर्व कांहीं आहे, सगुण, निर्गुण, साकार, निराकार व त्याहूनहि अनन्त. त्या



कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

ॐ

अनंततेच्या अनेक शक्तिप्रेरणा अजून अवतारालासुद्धा ज्ञात नाहीत. त्यामुळे कोणत्याहि सांच्यांत (मनाच्या अनुभूतीच्या वा तत्त्वज्ञानाच्या) ईश्वराला बद्ध करूं नकोस. त्याच्या अनन्ततेचें सम्यक्–दर्शन होण्यासाठी त्याच्या प्रकटीकरणास जास्तींत जास्त वाव दिला पाहिजे. सध्याचें मानवी शरीर, मन व बुद्धि यांवाटें ईश्वराचे कांही स्तरच साक्षात्कारित होतील, कारण मोठ्या विद्युत्–प्रवाहाच्या प्रकटीकरणासाठी मोठें विद्युत्–यंत्रच हवें.

भवितव्यता मला सांगतें दिव्य मानवांची जमात लवकरच अस्तित्वांत येईल. तिची सुरवात इ. स. २००६ नंतर होईल. अनेक नूतन प्रकटीकरणें होतील.

परवाच भगवंतांनीं मला त्यांच्या परमगंभीर शब्दांत सांगितलें की "माझी कृपा आणीबाणीच्या परिस्थितींत अवतरेल व विनाशापासून जगाचा बचाव होईल. कोबाल्ट बॉम्ब व ॲटॉमिक वेपन्स हीं सृष्टीचा नाश करण्यास समर्थ होणार नाहीत." ('कोबाल्ट बॉम्ब' व 'ॲटॉमिक वेपन्स' भगवंताच्या ध्वनींत होतीं).

ॐ

हें भगवंतांनीं दिलेलें आश्वासन महान् आहे. ज्या वेळीं मीं हें आश्वासन ऐकलें त्या वेळीं माझें हृदय स्थिरावलें व कांही दिवस तरी पूर्ण शांतता, गंभीर पावित्र्य व एक प्रचण्ड शक्ति माझ्यांतून खेळूं लागली.

प्रियोत्तमा, गा, गा; भगवंताचें गुणगान गा ! प्रेमानें त्याला हृदयांत कवटाळ; त्याच्या आनंदानें धुंद होऊन नाच ! तो तुझें सर्वस्व आहे. आपला धनी, माता, पिता सर्व कांही तो आहे. चल, आपण त्याच्याकडे जाऊं. माझ्यावर जर तुझी पूर्ण श्रद्धा असेल, तर माझ्या हाताला धरून चल.

भगवंतांनीं मला सांगितलें आहे, "तूं माझें साधन आहेस. माझा संदेश तुझ्यावाटें प्रगट होईल. तूं माझा संदेष्टा ( Messenger ) आहेस."

तुला वस्तुरहस्य याविषयी मला सांगायचें आहे. पण तत्पूर्वी आपण एकच वस्तु विचारार्थ घेऊं. ही एक खुर्ची आहे. मी ज्या वेळीं या खुर्चीच्या आंत व तिच्या सूक्ष्म अस्तित्वांत शिरतों,

ॐ

त्या वेळीं प्रथम तिचा प्राणस्पंद स्पंदतांना आढळतो व ती खुर्ची केवळ स्पंदतांना दिसते व तिचा आकार बाष्पाकार दिसतो. ही खुर्ची हें वस्तुगत स्थूल अस्तित्व येण्यापूर्वीची स्थिति आहे; व ही प्राणस्पंद स्थिति वैश्विक प्राणस्पंदनस्तरांवर अनुभूतीस येते ( Universal Vibratory Plane ). ही खुर्ची या स्तरांवर हलत्या पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणें हलती दिसते.

त्यानंतर पुन्हा ज्या वेळीं तो स्तर भेदून आंत जातो, त्या वेळीं ती खुर्ची 'क्ष' किरणांनीं ( X-ray ) काढलेल्या प्रतिमे-सारखी म्हणजेच तिच्या बाह्यरेषा ( Out-lines ) च फक्त प्रकाशमय दिसतात. ह्या खुर्चीचा बाह्याकार प्रकाश नलिकेंनीं बनविला आहे. जणूं ही खुर्ची रेडियमसारख्या चमकणाऱ्या द्रव्यांनींच बनविली आहे. हें खुर्चीचें दुसरें अस्तित्व ( Universal Inspiratory Plane ) वैश्विक स्फूर्तनस्तर या स्तरांवर प्रतीत होतें. त्यानंतर ह्याच खुर्चीच्या आंत ज्या वेळीं मी गूढ दृष्टीनें पाहूं लागतों, त्या वेळीं तीच खुर्चीची अस्मिता फक्त प्रतीत होते. म्हणजे तीच स्फूर्तन-स्तरांवर प्रतीत होणारी प्रतिमा एका विश्व-

ॐ

नीरव गाभाऱ्यांत स्पंदत असते व ही स्पंदना ( Universal Ego Plane ) वर प्रतीत होते. जणूं कांही चकाकणारी प्रतिमा म्हणजे स्थूल खुर्चीचें जीव स्वरूप आहे व तें हृदयाप्रमाणे स्पंदत असतें. त्यानंतर येणारें अस्तित्व म्हणजे ज्यापासून खुर्चीचीं अस्तित्वें प्रतीत होतात व उगम पावतात असा एक अणुप्रमाणे, सूर्यासारखा अत्यंत तेजस्वी बिंदु, ज्यामध्ये खुर्चीची अनेक अस्तित्वें भगवंत शक्तीनें विश्वनिर्मितीच्या वेळीं आपल्या महान् प्रज्ञेनीं निर्मिली व प्रेरिली. हा बिंदु स्थूल खुर्चीपासून खूप वर प्रतीत होतो व हा बिंदु शाश्वततेनें चमकत असतो. या बिंदूमध्येंच स्थूल खुर्चीची वर्तमान, भविष्य, भूत प्रतिमा व रूपें चित्रित झालेलीं असतात. हा बिंदु वैश्विक अस्तित्व स्तरांवर ( Universal Plane of Point of Existence ) अनुभवास येतो. या बिंदूनंतर केवळ अखंड परमात्मस्थिति, अनंतता अनुभूतीस येते ज्या अनंततेंत सर्व स्तर सायुज्यतेनें एकत्रित झालेले असतात. सर्वत्र ईश्वर आहे याचा अर्थच हा की या सर्व स्तरांमागे, बिंदूंच्या पलीकडे, असणारी अनन्तता सर्व वस्तुमात्राला, चराचराला आंतून जोडते.

ॐ

प्रत्येक वस्तूस हीं अस्तित्वें व हा बिंदु असतो व वस्तूच्या अंतिम स्तरांवर अनन्तता विलास करीत असते, जी अनन्तता सर्वांना अन्तर्यामांतून जोडते.

लक्षांत ठेव, यापुढचा भाग मी तुला नंतर केव्हातरी लिहीन. प्रत्येक स्तराचीं वैश्विक कार्यें व त्यांचा जीवाशीं संबंध व बिंदुस्तर यांविषयी आपण नंतर कधीतरी विचार करूं.

॥ ॐ तत् सत् ॥



शि. प्र. मंडळी म. म. ... ग्रंथालय
493

प्रकाशक : श्री. सुधाकर वेल्हे, चिटणीस, श्रीदत्ताबाळ मिशन डिव्हाइन,
कोल्हापूर.
मुद्रक : श्री. बा. गो. कुलकर्णी, श्रीसरस्वती छापखाना, कोल्हापूर.